# मराठी

**( अनिवार्य )**

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 300 |
|---|---|

## प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

**प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा**

सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.

प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.

प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे मराठीत (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.

जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.

प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.

# MARATHI

**( Compulsory )**

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 300 |
|---|---|

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question is indicated against it.

Answers must be written in MARATHI unless otherwise directed in the question.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the answer-book must be clearly struck off.

www.reliableacademy.com 9822333999

**1.** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर *600* शब्दांत निबंध लिहा : 100

*(a)* मुलांच्या कुपोषणाची समस्या

*(b)* वैश्विक शांततेची आव्हाने

*(c)* मातृभाषा आणि प्राथमिक शिक्षण

*(d)* भाडोत्री मातृत्वाचा सामाजिक स्विकार

**2.** पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा : 12×5=60

प्राचीन भारतामध्ये राजेशाहीचा एवढा प्रभाव होता की राजाला राज्याचा आत्मा म्हटले जात असे. प्राचीन धार्मिक ग्रंथांच्या नुसार राजा हा प्रजेसाठी ईश्वराचा प्रतिनिधी आहे असे समजले जात असे. त्यामुळे प्रजा राजाच्या सहकार्याने आपल्या दुःखी जीवनापासून मुक्तता मिळवू शकत असे. राजा नसलेल्या समाजाचा जीवनव्यवहार त्रासदायक होत असे. प्राचीन भारतातील विद्वानांनी 'राजा आणि राज्य' यांच्या उत्पत्तीसंदर्भात वेळोवेळी अनेक विचार मांडले आहेत. त्यांना वेगवेगळ्या सिद्धान्तांच्या पार्श्वभूमीवर सादर केले आहे. उदाहरणार्थ, दैवी सिद्धान्त, शक्ती सिद्धान्त, संरक्षण सिद्धान्त व सामाजिक सलोखा सिद्धान्त इत्यादी.

कौटिल्याने राज्याला मानवी जीवनासाठी महत्त्वपूर्ण, आवश्यक व कल्याणकारी संस्था मानले आहे. त्याने राजाच्या उत्पत्तीसंदर्भात क्रमबद्ध मांडणी केलेली नाही, परंतु त्याच्या अर्थशास्त्रामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की जसे लहान माशाला मोठा मासा गिळंकृत करतो, त्या प्रमाणेच प्राचीन कालखंडामध्ये सबळ लोक निर्दलांना त्रास देत असत. हा मन्याय (मत्स्य-न्याय) म्हणजेच 'जंगली राज'ने प्रजा त्रासली जात असे. त्रासलेल्या प्रजेने एकत्र येऊन एका सक्षम व्यक्तीला आपला राजा बनवले. त्यांनी राजाला शेतीच्या उत्पन्नातील सहावा भाग आणि व्यापाराच्या उत्पन्नातील दहावा भाग देण्याचे निश्चित केले. त्या बदल्यात राजाने प्रजेच्या कल्याणाची जबाबदारी स्वतःकडे घेतली. जे लोक राजाद्वारे केलेल्या व्यवस्थेला मानत नव्हते, त्यांना शिक्षा केली जात असे. राजाला इंद्र आणि यम यांच्याप्रमाणे प्रजेचा रक्षक आणि कृपा करणारा मानले गेले आहे. कौटिल्याच्या मतानुसार राजाच्या आज्ञेचे पालन न करणे किंवा त्याचा अपमान करणे निषिद्ध मानले जात असे.

ज्या समाजामध्ये राजाच्या माध्यमातून प्रजेचे रक्षण केले जाते त्या ठिकाणचे लोक घराचे दरवाजे उघडे ठेऊन वावरतात. जेव्हा राजा रक्षण करतो तेव्हा महिला एकटी देखील सालंकृत होऊन रस्त्याने विहार करते. राजाने संरक्षित केलेल्या समाजात 'मानवतेचे साम्राज्य' असते. अशा राज्यामध्ये सर्व प्रकारची गती-प्रगती असते. इतर प्राचीन ग्रंथांसोबतच कौटिल्याच्या

www.reliableacademy.com 9922333999

'अर्थशास्त्रा'मध्येही याच प्रकारचे सत्य प्रतिपादित केले गेले आहे. सुरूवातीला राजाचा पदभार अस्थिर आणि अधिकार मर्यादित होते. परंतु उत्तर-वैदिक कालखंडामध्ये राज्यांचा विस्तार जसजसा वाढत गेला, तसतसे राजाचे अधिकार व ऐश्वर्यात वाढ होत गेली. प्रजेच्या संरक्षणापेक्षा राजाच्या संरक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले गेले. राजाच्या पद-प्रतिष्ठेनुसार राजाचे वैभव, दिमाख आणि देखावा वाढत गेला. शुक्रनीतीमध्ये या बाबतीत विस्तृत वर्णन केले गेले आहे.

*(a)* राजा आणि राज्याची प्राचीन संकल्पना कशी आहे? 12

*(b)* 'मन्याय' (मत्स्य-न्याय) यास अन्याय का म्हटले जाते? 12

*(c)* राजा आणि प्रजेच्या आपापसांतील संबंधाचा आधार काय आहे? 12

*(d)* 'मानवतेचे साम्राज्य' म्हणजे काय? 12

*(e)* उत्तर-वैदिक कालखंडामध्ये प्रजेच्या स्थितिगतीमधील बदल सांगा. 12

**3.** खालील उताऱ्याचा अंदाजे एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश तुमच्या शब्दात लिहा : 60

राजा राममोहन राय यांच्या कार्यास विरोध करणाऱ्या भारतीय व्यापाऱ्यांनी 1830मध्ये 'ब्राम्हो समाजा'चा प्रभाव संपुष्टात आणण्यासाठी 'धर्म समाज' संस्थेची स्थापना केली. दरम्यानच्या काळात हेन्री डेरिजिओने आधुनिक विचारांच्या प्रचारार्थ 'हिंदू कॉलेज'मध्ये ॲकॅडेमिक असोसिएशनची स्थापना केली होती. ही संघटना ताठर रूढी-परंपरा आणि अंधश्रद्धांना विरोध करण्याच्या बाबतीत इतर कोणत्याही संघटनेपेक्षा अत्यंत प्रभावी होती. ह्याच संघटनेतून पुढे 'युवा बंगाल'यी स्थापना झाली. हिंदू कॉलेजच्या कर्मचाऱ्यांनी त्रास दिल्यामुळे ह्या संघटनेचे विघटन झाले, त्यावेळी त्याच्या पुर्वीच्या सदस्यांनी 'ब्राह्मो समाजा'त प्रवेश केला. राजा राममोहन राय यांच्या निधनानंतर ह्या संघटनेचे नेतृत्व बंगालमधील एक प्रमुख व्यापारी द्वारकानाथ ठाकुर यांच्याकडे आले. एकोणिसाव्या शतकाच्या चौथ्या आणि पाचव्या दशकात ज्ञानप्रसार आणि अनुषंगिक इतर ध्येये साकारण्यासाठी अशा प्रकाराच्या सामाजिक संघटनांची एकामागोमाग एक स्थापना होत राहिली. 1851मध्ये कलकत्त्यात 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन' नावाच्या एका राष्ट्रवादी राजकीय संघटनेची स्थापना झाली.

या प्रकारच्या घटना मुंबईत देखील प्रत्ययास आल्या. देशाच्या या भागातील अशा आंदोलनांचे प्रमुख नेते हे सधन व प्रतिष्ठित पारशी होते. पारशी वासाहतीक शासनाचे पाठीराखे होते. हे महाराष्ट्रातील उदयोन्मुख बुद्धिवादी युवक होते, जे युरोपियन पद्धतीने संचालित होणाऱ्या 'एलफिन्स्टन कॉलेज' सोबत जोडले गेले होते. या बुद्धिवादींपैकी प्रमुख बाळशास्त्री जांभेकर यांनी 'मुंबई दर्पण' या इंग्रजी-मराठी साप्ताहिकाची सुरूवात केली आणि आपल्या देशातील भारतीयांनी इंग्रजी

www.reliableacademy.com 9222333999

प्रशासनात सहभागी होण्याची वकालत केली, तसेच वासाहतीक कर आणि शुल्कनीतीबाबत टीकाही केली. ज्यांनी भारतीय इतिहासावर मराठीत पुस्तक लिहिले, त्या रामकृष्ण विश्वनाथ यांनी भारतातील ब्रिटिश धोरणांवर टीका केली. खरेतर त्यांचा विचार असाही होता की सगळे काही सुरळीत होऊ शकेल जर त्यातूनच बुद्धिवादी इंग्रज व भारतीयांमध्ये घनिष्ठ संबंध निर्माण होतील. गोपाळ हरी देशमुख, जे पुण्यातून 'प्रभाकर'मध्ये 'लोकहितवादी' या टोपण नावाने लिहित असत त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचे अपहरण होणाऱ्या कारणांचे विश्लेषण केले. त्यांच्या मतानुसार जुन्या प्रस्थापित परंपरांचे पालन करणे आणि वरिष्ठ वर्गाचे वर्चस्व असणे यामुळे भारतीय जनतेमध्ये विसमतेची दरी निर्माण झाली होती.

1852मध्ये स्थापन झालेल्या 'मुंबई असोशिएशन'मध्ये तेव्हा फूट पडली जेव्हा युवक विद्यार्थ्यांनी सर्व भारतीयांसाठी इंग्रजांप्रमाणेच समान अधिकारांची मागणी केली, परिणामी मवाळपंथीय उच्चवर्गीय व्यापारी त्यामुळे यापासून वेगळे झाले. एकट्या मद्रास असोसिएशननेच भारतीय जमीनदारांकडून शेतकऱ्यांचे शोषण बंद करण्यासाठीचा प्रश्न उचलून धरला. त्यावेळी ईस्ट इंडिया कंपनी चार्टरचे पुनरावलोकन होत होते, त्यामुळे तिन्ही संघटनांनी भारतातील वसाहतवादी शासनाच्या अन्यायासंदर्भात लंडनमधील संसदेत याचिका सादर केली.

*(एकूण शब्द 338)*

**4.** पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा : 20

प्रत्येक देशाच्या इतिहासावर त्याच्या भौगोलिक प्रदेशाचा प्रभाव पडलेला असतो. भारताच्या संदर्भात, त्याची संस्कृती युगानुयुगांपासून स्वतंत्र पद्धतीने विकसित होत आली आहे. उत्तरेकडील पर्वतांचा भयंकर प्रतिबंध आणि दक्षिणेकडील समुद्रांमुळे भारत उर्वरित जगापासून वेगळा राहिला आहे. त्यामुळे त्याच्यावर अधिक प्रमाणात विदेशाचा प्रभाव पडू शकलेला नाही. हिमालय पर्वत पश्चिमेकडून पूर्वेकडे साधारणतः सोळाशे मैल लांब आणि पन्नास मैल रूंद अशी दुहेरी पद्धतीची भिंत आहे. पूर्वेकडील पत्कोई, नागा आणि लुशाइचे पर्वत आणि त्यांचे घनदार जंगल येण्याजाण्यात अडचणी निर्माण करतात. पश्चिमेकडे काटी खिंडी अवश्य आहेत, जशा की खैबर व बोलन खिंड, यामधूनच परकीयांचा प्रवेश होत असे. दक्षिणेकडे असलेल्या समुद्रामुळे शेकडो वर्षांपर्यंत भारतात सहजपणे ये-जा करण्यात अडचणी निर्माण झाल्या. परंतु त्यानंतर नौका क्षेत्रात पुरेशी प्रगती झाली, त्यामुळे समुद्री व्यापार सहज व सुगम बनला. 1498मध्ये वास्को-द-गामा यांच्या नेतृत्वाने पोर्तुगिज लोक सर्वात पहिल्यांदा समुद्री मार्गाने भारतात आले. त्यानंतर डच, फ्रेन्च आणि इंग्रज आले. हे सर्व खूप काळापर्यंत आपला प्रभाव भारतात निर्माण करण्यासाठी आपसांत संघर्ष करीत राहिले. याप्रकारे एकूणच भारताच्या भौगोलिक पृथकात्मतेमुळे येथील संस्कृतीवर परकीयांचा प्रभाव अधिक प्रमाणात पडू शकला नाही.

www.reliableacademy.com 9222833999

**5.** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

At the stroke of the midnight hour, when the world sleeps, India will awake to life and freedom. A moment comes when we step out from the old to the new. It is fitting that at this solemn moment we take the pledge of dedication to the service of India. The service of India means the service of the millions who suffer. It means the ending of poverty and ignorance. It means the ending of disease and inequality of opportunity. The ambition of the greatest man of our generation has been to wipe every tear from every eye. That may be beyond us, but as long as there are tears and suffering, so long our work will not be over. This is no time for petty and destructive criticism, no time for ill-will or blaming others. We have to build the noble mansion of free India where all her children may dwell.

It is a fateful moment for us in India, for all Asia and for the world. A new star rises, the star of freedom in the East, a new hope comes into being. May the star never set and that hope never be betrayed !

**6.** *(a)* खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा : 2×5=10

*(i)* अंग चोरणे

*(ii)* अंगाची लाही लाही होणे

*(iii)* अंगात वीज संचारणे

*(iv)* अंगवळणी पडणे

*(v)* अंगात नाही बळ आणि चिमटा घेऊन पळ

*(b)* खाली दिलेल्या कल्पनांचा *10* वाक्यांत विस्तार करा : 5×2=10

*(i)* मानवता हाच खरा धर्म

*(ii)* मी पाणी बोलत आहे

*(c)* खाली दिलेल्या विषयावर *20* वाक्यांचा संवाद लिहा : 10

पावसाची विविध रूपे

www.reliableacademy.com 9222333999

(*d*) खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1×5=5

(*i*) आस

(*ii*) पर्याय

(*iii*) उक्ती

(*iv*) कंजूष

(*v*) नदी

(*e*) खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1×5=5

(*i*) अनुकूल

(*ii*) शीलवान

(*iii*) गृहस्थ

(*iv*) स्वाधीन

(*v*) योगी

★ ★ ★

www.reliableacademy.com 9222333999